**सूर्यान एनर्जी प्रा. लि.**

सोलर बसवा अन् ७८ हजार सबसिडी मिळवा! लाईट बिल 'झिरो' करा.

आजच शासन योजनेचा लाभ घ्या

पत्ता : राहुरी स्टेशन रोड, १८ एकर समोर, राहुरी.

शाखा : श्रीरामपूर । पुणे । रायगड । कोल्हापूर

संपर्क : ९२०९१७६०३०, ९८९०३०६८९०



sarvmanthan16@gmail.com

# दैनिक दिव्य सार्वमंथन

नवी दिशा, नवी आशा

मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२

इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा www.sarvmanthan.in



**श्रीयांश इंटरप्राईजेस**

गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.

सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरुन मिळतील.

पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर

संपर्क : ८७९३०९५०५०



। अहिल्यानगर । महाराष्ट्र । । वर्ष १ ले । अंक ११५ वा । सोमवार, ०७ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MHMAR/26/A3154 । पोस्टल परवाना : SRP/146/2026-2028 ।




# विद्यार्थ्यांचा पुण्यात आक्रोश

## । अध्यक्ष-सचिवांच्या राजीनाम्याची मागणी । रोहित पवार संविधान हाती घेऊन मोर्चात । सरकारने भूमिका स्पष्ट करावी : खा. सुळे

**दिव्य सार्वमंथन**
**पुणे । वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित पेपरफुटी, गैरप्रकार आणि परीक्षा प्रक्रियेतील अनियमिततेच्या निषेधार्थ सोमवारी पुण्यात विद्यार्थ्यांनी आक्रोश मोर्चा काढला. ओंकारेश्वर मंदिर परिसरातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षा विद्यार्थी सहभागी झाले असून, आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत एमपीएससी अध्यक्ष आणि सचिवांच्या राजीनाम्याची मागणी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चे आमदार रोहित पवार यांनी हातात भारतीय संविधान घेऊन या मोर्चात सहभाग घेतला. एमपीएससी ही स्वायत्त आणि महत्त्वाची घटनात्मक संस्था असल्याने तिच्या कारभारात निष्पक्षता आणि पारदर्शकता असणे गरजेचे आहे. स्वायत्त संस्थेवर निष्पक्ष व्यक्ती असली पाहिजे, अशी भूमिका रोहित पवार यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणानंतर विद्यार्थ्यांचा संताप अधिक तीव्र झाला आहे. या प्रकरणामुळे परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा किंवा त्यांना पदावरून हटवावे, अशी मागणी यापूर्वीही करण्यात आली होती.सरकारने जबाबदार व्यक्ती चर्चेसाठी पाठवावी

खासदार सुप्रिया सुळे यांनीही आंदोलनाला पाठिंबा देत सरकारने पान २ वर

**रोहित पवारांचा सरकारला थेट इशारा!**

'एमपीएससी स्वायत्त संस्था; तिच्यावर निष्पक्ष व्यक्तीच असली पाहिजे.संविधान हाती घेऊन आंदोलनात सहभागी झालेल्या रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांना ठाम पाठिंबा दिला. विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत. पेपरफुटीसारख्या गंभीर प्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य पणाला लागले आहे. एमपीएससीसारख्या स्वायत्त संस्थेवर निष्पक्ष व्यक्ती असणे गरजेचे आहे, अशी आक्रमक भूमिका त्यांनी मांडली.

# राहुरीत अडीच वर्षे 'राज'; श्रीगोंद्यात अडीच महिन्यांत ठेंगेचा 'गाशा'!

## लाचखोरीच्या कारवाया, नागरिकांचा रोष अन् तक्रारींची चर्चा



**दिव्य सार्वमंथन**
**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्याची सूत्रे स्वीकारून अवघे अडीच महिने उलटत नाहीत तोच त्यांची पुणे येथे बदली झाल्याची माहिती समोर आल्याने राहुरी व श्रीगोंद्यातील पोलीस, राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. नियमित प्रशासकीय प्रक्रियेचा भाग म्हणून ही बदली झाली की, स्थानिक पातळीवर निर्माण झालेल्या परिस्थितीचा त्यावर परिणाम झाला, याबाबत आता वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत.

ठेंगे यांच्या श्रीगोंद्यातील अल्प कार्यकाळाची तुलना त्यांच्या राहुरीतील तब्बल अडीच वर्षांच्या कार्यकाळाशी केली जात आहे. त्यामुळे 'राहुरीने अडीच वर्षे सांभाळले, मग श्रीगोंद्याने अडीच महिन्यांतच निरोप का दिला?' हा सवाल सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

श्रीगोंद्यात पदभार स्वीकारल्यानंतर काही काळातच पोलीस कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाया झाल्या. तीन पोलीस कर्मचारी लाच स्वीकारताना पकडले गेल्याच्या घटनांमुळे पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले. या घटनांनंतर स्थानिक पातळीवर पोलिसांच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त होत असल्याची चर्चा होती.

याच पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारी, पोलिसांच्या कारभाराबाबत व्यक्त झालेली नाराजी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलेल्या तक्रारी यामुळे श्रीगोंद्यातील वातावरण चर्चेत आले. काही नागरिकांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीविरोधात जाहीरपणे आवाज उठवल्याचेही बोलले जात आहे.

विशेष म्हणजे, ठेंगे यांनी श्रीगोंद्याची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी एका अनुभवी व सेवानिवृत्त पोलिस कर्मचाऱ्याने निरोपाच्या कार्यक्रमात त्यांना 'साहेब, श्रीगोंद्यात जपून काम करा' असा सल्ला दिल्याची चर्चा आहे. त्यावेळी हा सल्ला नेमका कोणत्या अनुभवातून दिला होता, याबाबत फारसे गांभीर्याने बोलले गेले नसले तरी सध्याच्या घडामोडींनंतर त्या वक्तव्याची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, ठेंगे यांच्या राहुरीतील कार्यकाळाचीही आता नव्याने चर्चा रंगली आहे. राहुरी हे वाळू तस्करी, अवैध धंदे, गुटखा विक्री यांसह विविध कारणांनी पान २ वर

# शेतकऱ्याचे अनुदान लुटणाऱ्या महिला तलाठ्याला ठोकल्या बेड्या

## मंगल तलाठी हिला ९ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी; राहुरी तालुक्यातील महिला तलाठ्याचा कारनामा

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्याच्या पूर्व भागातील महालगाव-मालुंजे शिवारात शेतकऱ्यांसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या लाखो रुपयांच्या अनुदानात गैरव्यवहार केल्याच्या आरोपावरून महिला तलाठी मंगल गुसिंगे हिला पोलिसांनी अटक केल्याने महसूल प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाला 'कुंपणच शेत खातंय' असे स्वरूप प्राप्त झाले आहे. तर मंगल गुसिंगे हिला न्यायालयात उभ केले असता तिला ९ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणाबाबत 'सार्वमंथन'ने २३ जून २०२६ रोजी आवाज उठवून संबंधित प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यानंतर महसूल प्रशासनाच्या माध्यमातून या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याची चर्चा होती.

मिळालेल्या माहितीनुसार, शासनाच्या पीक समूहग्राम योजनेअंतर्गतशेतकऱ्यांसाठीमंजूर झालेल्या अनुदानाचा गैरवापर केल्याचा आरोप संबंधित महिला तलाठ्यावर आहे. आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर करून बाहेरील जिल्ह्यातील सुमारे ३० ते ४० शेतकऱ्यांची नावे अनुदानासाठी समाविष्ट करण्यात आल्याचे तपासात समोर आल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, संबंधित शेतकऱ्यांना आपल्या नावावर अनुदान मंजूर झाल्याची माहितीच नसल्याचा आरोप आहे. बाहेरील जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नावावर मंजूर झालेले अनुदान राहुरी तालुक्यातील शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून मिळवून घेण्यात आले. त्यानंतर संबंधित रक्कम स्वतःच्या खात्यावर वर्ग केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करून त्यांच्याकडून काही रक्कम रोख अथवा ऑनलाइन स्वरूपात



स्वीकारल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या गैरव्यवहाराची माहिती बाहेरील जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी महसूल प्रशासनाकडे तक्रार केली. त्यानंतर वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी सुरू करण्यात आली होती. आता या प्रकरणात पोलिसांनी कारवाई करत महिला तलाठ्याला अटक केल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.

या प्रकरणात जालना येथे तीन लाख ६५ हजार रुपये तसेच १२ लाख २४ हजार ८०२ रुपयांच्या अनुदानातील गैरव्यवहाराचा उल्लेख करण्यात आला आहे. सन २०२२-२३ मध्ये माहेगाव येथेही भ्रष्टाचार केल्याचा आरोप संबंधित महिलेवर असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणातील फिर्यादी विजय बबनराव बेरड, मंडळधिकारी, राहुरी असून आरोपी मंगल रूपचंद गुसिंगे (वय ३३, रा. कौसरवाडी, ता. अंबड, जि. जालना) अशी माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, संबंधित महिला तलाठी यापूर्वीही विविध कारणांमुळे चर्चेत राहिल्याचा दावा करण्यात येत आहे. वाळू तस्करांशी कथित हितसंबंध असल्याच्या चर्चाही यापूर्वी झाल्या होत्या. मात्र, आता थेट शेतकऱ्यांसाठी आलेल्या शासनाच्या अनुदानाच्या गैरव्यवहाराचा आरोप झाल्याने या प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे. महिला तलाठ्याने नेमका किती रुपयांचा गैरव्यवहार केला, आणखी किती लाभार्थ्यांच्या नावांचा वापर करण्यात आला आणि या प्रकरणात अन्य कोणी सहभागी आहे का, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राजू जाधव पुढील तपास करीत आहेत.

**राहुरी बाजार समिती**
**कांदा आवक भाव**

| | |
|---|---|
| आवक | ९९८८ |
| नं. १ कांदा | ४२०० ते ४८०० |
| नं. २ कांदा | ३००० ते ४२०० |
| नं. ३ कांदा | १००० ते ३००० |
| गोल्टी | २००० ते ४२०० |
| एक्स्ट्रा सुपर क्वॉलिटी | ६१०० |

**इव्हेंट**

नेहमी चाले उत्सव
कसे सर्वत्र वरचेवर
इव्हेंट मॅनेजमेंट ते
गाजे शहर गावभर

मोठ मोठाले मंडप
रे पहुंडले रस्त्यावर
रस्ते झाले खड्डेमय
केले खड्डे खोलवर
वीज कनेक्शन घ्या
कुठल्याही पोल वर
कुणा आहे दहशत
असले पोलखोलवर

डीजेला घाला शपथ
आवाजवाढे ढोलवर
डेसिबल चिंता नाही
ओळखी असे दूरवर

ठेका धरतात पुढारी
अति उत्साह अनावर
नशेत कुणी झिंगतात
अंकुश कुठले मनावर

उधळण हार फुलांची
रे गुलाल जेसीबी भर
मने सगळी कुजलेली
सुटली दुर्गंधी गावभर

सामान्यांचे निधी खर्च
प्रस्थ वाढतेयं भराभर
समस्या मात्र तशाचं
उभ्या प्रतिक्षे भारंभर

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा धडाका; १३ ते १८ सप्टेंबर महत्त्वाचे!

## गणरायासोबत वरुणराजाचीही हजेरी

**दिव्य सार्वमंथन**
**पुणे । वृत्तसेवा**

ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठी दडी मारल्याने राज्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामावर पावसाअभावी संकटाचे ढग दाटले असून, शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. मात्र आता पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या बळीराजासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, १३ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर दरम्यान विविध



भागांत दमदार ते मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांच्या अंदाजानुसार, सप्टेंबर महिन्यात राज्यात पावसाचे पुनरागमन होण्याची शक्यता आहे. विशेषतः १३ ते १८ सप्टेंबरदरम्यान राज्यातील अनेक भागांत जोरदार पाऊस होऊन शेतातून पाणी बाहेर पडेल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. गणेशोत्सवाच्या काळात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, त्यापूर्वीही काही भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो.

विदर्भ आणि कोकणात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता असल्याने या भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पावसाच्या या संभाव्य पुनरागमनामुळे दीर्घकाळापासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

### नमुना क्र. ६४ वर नगराध्यक्षांची स्वाक्षरी बंधनकारक नाही

मुंबई । नगरपालिकांच्या आर्थिक व्यवहारातील नमुना क्रमांक ६४ वर नगराध्यक्षांची स्वाक्षरी आवश्यक आहे की नाही, याबाबत सुरू असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. २०१८ मध्ये करण्यात आलेल्या कायद्यातील दुरुस्तीमुळे नगराध्यक्षांचे संबंधित वित्तीय नियंत्रणाचे अधिकार वगळण्यात आले आहेत. त्यामुळे नमुना क्र. ६४ वर मुख्याधिकाऱ्यांसोबत नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक नसल्याचे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे. शासनाच्या या भूमिकेमुळे राज्यातील सर्व नगरपालिका व नगरपंचायतींमध्ये नमुना क्र. ६४ संदर्भात एकसमान कार्यपद्धती लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# 'भारत संसद'च्या नावाने कारवर राजमुद्रा अन् कमळ!

## नावाचा वापर नेमका कुणाच्या परवानगीने?

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी येथील नगर मनमाड रोड वरिल एका कारवर लोगो आणि उल्लेखामुळे आता चांगलाच राजकीय सवाल निर्माण झाला आहे! नगर-मनमाड महामार्गावर एका चारचाकी वाहनावर 'भारत सरकार संसद' असा उल्लेख, भारतीय राजमुद्रेचा लोगो आणि भाजपचे कमळ चिन्ह लावलेले आढळून आले आहे.

विशेष म्हणजे, प्राथमिक माहितीनुसार हे वाहन





राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते यांच्या नातेवाईकाशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे.

मात्र, वाहनामध्ये खासदार रामराव वडकुते स्वतः उपस्थित नव्हते, तसेच हे वाहन खासदारांचे अधिकृत वाहन असल्याचीही पुष्टी झालेली नाही. खासदारांचे नाव, 'भारत सरकार संसद'चा उल्लेख आणि भारतीय राजमुद्रेचा लोगो खासगी वाहनावर लावण्याचा अधिकार नेमका कुणाला आहे?

या वाहनावरील चिन्हे आणि उल्लेख पाहून नागरिकांमध्येही चर्चेला उधाण आले आहे. एखाद्या व्यक्तीने किंवा खासगी वाहनाने अशा प्रकारचे शासकीय अथवा संसदीय स्वरूपाचे चिन्ह वापरले असल्यास त्यासाठी अधिकृत परवानगी आहे का, याची पडताळणी पान २ वर

# गणेश विसर्जन मिरवणुकीत 'नो डीजे'

## राहुरीत गणेश मंडळांना पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांचा सज्जड इशारा

- कायदा हातात घेतल्यास कारवाई
- 'गुन्हेगारांच्या यादीत येऊ नका!'
- एसपी सुदर्शन यांचा सज्जड इशारा
- 'डीजेमुक्त' मिरवणुकीचे आवाहन

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राहुरी शहरातील गणेश मंडळांना पोलीस प्रशासनाने यंदा शिस्त, कायदा आणि सामाजिक बांधिलकीचा झणझणीत कानमंत्र दिला आहे. गणेश मंडळांनी राजकारणापासून चार हात लांब राहावे, सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे आणि विशेषतः डीजेच्या आवाजाची मर्यादा ओलांडू नये, असे स्पष्ट निर्देश पो.अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले.

'राजकारण राजकारणाच्या जागेवर ठेवा. मिरवणुकीत अशा प्रकारचे फोटो अथवा प्रदर्शन करू नका, जे तुम्हाला भविष्यात अडचणीत आणू शकते. आमची तुमच्याशी कोणतीही दुश्मनी नाही; मात्र कायदा मोडला तर कारवाई करावीच लागेल. मला कारवाई करण्यासाठी भाग पाडू नका,' असा इशारा त्यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना दिला. राहुरीत शांतता कमिटीच्या बैठकीत ते बोलत होते.

राहुरी ही पुण्यभूमी असून येथील मंडळांनी महाराष्ट्रासमोर आदर्श निर्माण करावा, पारंपरिक वाद्यांना प्राधान्य



द्यावे आणि यंदाची विसर्जन मिरवणूक डीजेमुक्त काढावी, असे आवाहन केले. डीजे साऊंड सिस्टीमच्या वाढत्या आवाजामुळे वृद्ध, लहान मुले तसेच आजारी व्यक्तींना त्रास होतो. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाचे नियम पायदळी तुडवून उत्सव साजरा करण्यापेक्षा सामाजिक भान जपत गणेशोत्सव साजरा करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. 'लिस्टवर असणाऱ्या गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली जाणार आहे. तुम्ही त्या यादीत येऊ नका. पुढील विसर्जन मिरवणुकीत तुमचे नाव पोलिसांच्या कारवाईच्या यादीत येऊ देऊ नका,' असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन करताना, मंडळांनी गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करावी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, सायकली यांसारखी मदत करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपावी, असेही त्यांनी सांगितले. 'डीजे वापरू नये, असे सांगणारा मी ही भारतीय नागरिक आहे. आदर्श पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांचा सन्मान केला जाईल,' असे एसपी सुदर्शन यांनी स्पष्ट केले. यावेळी पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर, मुख्याधिकारी विद्या पाटील, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, तहसीलदार अमित पवार यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. पो.नि. रवींद्र देशमुख, आप्पासाहेब ढुस, गणेश विघे, अरुण साळवे, देवेंद्र लांबे, शिवाजी घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, प्रतिक तनपुरे, सोन्याबापू जगधने, नंदकुमार तनपुरे, अनिल कासार, प्रदीप भुजाडी, राजेंद्र उंडे, अक्षय तनपुरे, राहुल शेटे, आरिफ शेख, सुनील पवार, बबन गुलदगड, निलेश सिरसाठ, गणेश खैरे, निलेश जगधने आदी उपस्थित होते.

गणेशमंडळांनीगरजूविद्यार्थी-विद्यार्थिनींनाशिक्षणासाठी सायकली उपलब्ध करून द्याव्यात. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मदत होईल आणि सामाजिक उपक्रमाला हातभार लागेल, अशी कृती मंडळांनी करावी.'यावेळी राहुरीतील विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

- रवींद्र देशमुख, पोलीस निरीक्षक



संपादकीय...
मो. ९८२२५४४०७२

# जरांगेंच्या उपोषणाने सरकारची कसोटी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा दहावा दिवस उजाडला आहे. दहा दिवसांचा काळ हा कोणत्याही उपोषणासाठी मोठा असतो. त्यातच गेल्या दोन दिवसांपासून पाणी, सलाइन आणि वैद्यकीय उपचार नाकारण्याची भूमिका घेतल्याने जरांगे यांची प्रकृती खालावत चालली आहे. वैद्यकीय तपासणीलाही त्यांनी नकार दिल्याचे सांगितले जात आहे. एका बाजूला आरक्षणाचा अत्यंत संवेदनशील प्रश्न आणि दुसऱ्या बाजूला आंदोलनकर्त्यांच्या ढासळत्या प्रकृतीमुळे निर्माण झालेली चिंता, अशा दुहेरी कोंडीत महाराष्ट्र उभा आहे.अशा परिस्थितीत सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. आंदोलनकर्त्यांच्या प्रत्येक मागणीला तातडीने मान्यता देणे शक्य नसते. त्यामागे घटनात्मक, कायदेशीर आणि न्यायालयीन मर्यादा असतात. मात्र मागणी मान्य करणे आणि संवाद साधणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. सरकार मागण्या मान्य करू शकत नसेल, तर त्यामागील कायदेशीर अडचणी स्पष्टपणे सांगू शकते. कोणता मार्ग उपलब्ध आहे, त्यासाठी किती वेळ लागेल, कोणत्या पातळीवर निर्णय होऊ शकतो, याची माहिती आंदोलनकर्त्यांना आणि जनतेला देता येते. पण संवादच नसेल, तर संशयाला जागा निर्माण होते.आरक्षणाचा प्रश्न भावनिक असला तरी त्याचे उत्तर भावनेतून देता येणार नाही. मराठा समाजाच्या मागण्या दीर्घकाळापासून सुरू आहेत. विविध सरकारांनी या प्रश्नावर वेगवेगळे निर्णय घेतले, आश्वासने दिली, कायदे केले आणि त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत अनेक निर्णय बदलले. सरकारच्या धोरणांवर कठोर शब्दांत टीका झाली म्हणून गुन्हे दाखल करण्याची घाई करणेही योग्य नाही. परंतु त्याचवेळी व्यक्तिगत अवमान, धमकी, शिवीगाळ किंवा कायदा हातात घेण्याच्या प्रकारांना आंदोलनाचे कवच मिळता कामा नये.कायद्याचे राज्य म्हणजे कोणाच्या विरोधात कारवाई करायची आणि कोणाला मोकळे सोडायचे, याचा निर्णय राजकीय सोयीनुसार घेणे नव्हे. सरकारच्या बाजूने असलेला असो वा विरोधात असलेला कायद्याची अंमलबजावणी समान पद्धतीने झाली पाहिजे. प्रशासनाने हा विश्वास निर्माण केला नाही, तर 'दुहेरी निकष' असल्याची भावना अधिक बळावते.फडणवीस यांनी दुटप्पी भूमिका घेऊ नये, अशी टीका होत असेल तर तिचे राजकीय खंडन करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून सरकारने आपली भूमिका स्पष्ट करणे अधिक परिणामकारक ठरेल. पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि स्पष्ट संवाद हाच त्यावरचा सर्वोत्तम उपाय आहे. सरकारवर प्रश्न उपस्थित करताना आंदोलनकर्त्यांच्या जबाबदारीकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. उपोषण हे लोकशाहीतील प्रभावी अस्त्र आहे; परंतु स्वतःचे आरोग्य धोक्यात घालणे, वैद्यकीय उपचार नाकारणे किंवा समर्थकांना रस्त्यावर उतरवून सामान्य जनतेला त्रास होईल अशी परिस्थिती निर्माण करणे, यामुळे आंदोलनाचा नैतिक आधार कमकुवत होऊ शकतो.जरांगे यांचे आरोग्य हा आता केवळ त्यांचा वैयक्तिक विषय राहिलेला नाही. त्यांच्या समर्थकांची भावनिक गुंतवणूक मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक निर्णयाचा परिणाम हजारो-लाखो लोकांच्या भावनांवर होतो. म्हणून आंदोलनाच्या नेतृत्वानेही परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील सामाजिक रचनेत आरक्षण हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. एका समाजाची मागणी पूर्ण करताना दुसऱ्या समाजात अन्यायाची भावना निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे राजकीय दबावाखाली घेतलेला तात्पुरता निर्णय भविष्यात पुन्हा न्यायालयीन किंवा सामाजिक संघर्षाचे कारण ठरू शकतो.सरकारने केवळ आंदोलन शांत करण्यासाठी आश्वासन देणे टाळले पाहिजे. त्याऐवजी कायद्याच्या चौकटीत टिकणारा, न्यायालयात टिकणारा आणि विविध समाजघटकांना स्वीकारता येईल असा मार्ग शोधला पाहिजे. हा मार्ग कठीण आहे; पण शासन करण्याचा अर्थच कठीण प्रश्नांवर तोडगा शोधणे हा आहे.मराठा आरक्षणाचा प्रश्न जितका जुना आहे, तितकाच तो संवेदनशीलही आहे. या प्रश्नाचे राजकीय भांडवल करण्याचा मोह सर्वच पक्षांनी टाळला पाहिजे. एका सरकारने दिलेले आश्वासन दुसऱ्या सरकारने रद्द करणे, आंदोलन वाढले की आश्वासन देणे आणि परिस्थिती शांत झाली की प्रश्न पुन्हा पुढे ढकलणे, हा प्रकार आता थांबला पाहिजे.कारण प्रत्येक आंदोलनानंतर समाजात निर्माण होणारी दरी वाढत जाते. मराठा आणि ओबीसी समाजातील तणाव वाढणे महाराष्ट्रासाठी कोणत्याही परिस्थितीत हिताचे नाही. राजकीय पक्षांना निवडणुकीत त्याचा फायदा होऊ शकतो; पण समाजाला त्याची किंमत दीर्घकाळ मोजावी लागू शकते.म्हणूनच सरकारने या प्रश्नाकडे निवडणुकीच्या चष्म्यातून नव्हे, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. आंदोलनकर्त्यांनीही आपला संघर्ष व्यापक सामाजिक हिताला बाधा येणार नाही, अशा पद्धतीने पुढे नेला पाहिजे. आज परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. जरांगे यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त होत असताना सरकारचे मौन अधिकच अस्वस्थ करणारे ठरते. संवाद सुरू करण्यासाठी आंदोलन आणखी किती टोकाला जाण्याची सरकार वाट पाहणार? आणि सरकारशी संवाद साधण्यासाठी आंदोलनाने आणखी किती कठोर भूमिका घ्यायची? सरकारने संवादाचे दार उघडावे. आंदोलनकर्त्यांनीही संवादाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. आरक्षणाच्या प्रश्नावर कायदेशीर आणि घटनात्मक मार्ग शोधण्यासाठी सर्व संबंधित पक्षांना एका टेबलावर आणावे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा पारदर्शक चर्चा व्हावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, कोणत्याही व्यक्तीच्या प्रकृतीला किंवा महाराष्ट्राच्या सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होण्यापूर्वी तोडगा काढण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न झाले पाहिजेत.उपोषणाचा दहावा दिवस हा केवळ आंदोलनाचा टप्पा नाही; तो सरकारच्या संयमाची, प्रशासनाच्या निष्पक्षतेची आणि राजकीय इच्छाशक्तीची कसोटी आहे. आता मौन नको संवाद हवा. आरोप नको तोडगा हवा. आणि आरक्षणाच्या प्रश्नावर तात्पुरती मलमपट्टी नव्हे, तर कायमस्वरूपी कायदेशीर मार्ग हवा.

# सणासुदीत मुख्य रस्त्यांवर स्टॉल नको

## बाजारपेठा वाहतूक कोंडीमुक्त ठेवा

### सात्रळ, सोनगाव, धानोरे बाजारपेठेत घाऊक खरेदीदारांची मोठी गर्दी; रस्त्यावर स्टॉल लावणाऱ्या विक्रेत्यांना ग्रामपंचायतींनी आधीच सूचना देण्याची मागणी

**दिव्य सार्वमंथन**
**सोनगाव | प्रतिनिधी**

सणासुदीचा काळ जवळ येताच सात्रळ, सोनगाव आणि धानोरे येथील बाजारपेठांमध्ये गणपती मूर्ती, पूजासाहित्य, पोळ्याचे साहित्य, फटाके स्टॉल तसेच विविध प्रकारच्या सजावटीच्या साहित्याची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू होते. या बाजारपेठांमध्ये परिसरातील गावांमधून तसेच घाऊक व किरकोळ ग्राहक मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी येत असतात. मात्र, मूर्ती विक्रेते आणि सजावटीच्या साहित्याचे विक्रेते मुख्य रस्त्यावरच स्टॉल उभारून व्यवसाय करीत असल्याने वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो.



सात्रळ, सोनगाव आणि धानोरे या बाजारपेठा परिसरातील नागरिकांसाठी खरेदीचे प्रमुख केंद्र आहेत. विशेषतः सणासुदीच्या काळात घाऊक ग्राहक मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी येत असल्याने बाजारपेठेतील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ वाढते. त्यातच मुख्य रस्त्याच्या कडेला मोठमोठे स्टॉल उभारून साहित्य मांडण्यात आल्याने रस्त्याची उपलब्ध जागा कमी होते. परिणामी वाहनांना मार्ग काढताना अडचणी येतात, तर पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागतो.

स्टॉलवरील साहित्य पाहण्यासाठी ग्राहक रस्त्यावरच थांबत असल्याने अनेकदा वाहतुकीचा खोळंबा होतो.

**ग्रामपंचायतींनी सणापूर्वीच सूचना द्यावी व रस्ता सोडून जागा निश्चित करून द्याव्यात**

सण सुरू झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा संबंधित ग्रामपंचायतींनी सणासुदीच्या काळातील बाजारपेठेचे नियोजन आधीच करणे गरजेचे आहे. मुख्य रस्त्यावर स्टॉल उभारून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये, याबाबत मूर्ती विक्रेते, सजावटीचे साहित्य विक्रेते आणि संबंधित व्यावसायिकांना सण सुरू होण्यापूर्वीच ध्वनीक्षेपकाद्वारे स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

एका बाजूला माल घेण्यासाठी आलेली वाहने, दुसऱ्या बाजूला रस्त्यावर उभारलेले स्टॉल आणि त्यामध्ये खरेदीसाठी थांबलेले ग्राहक, अशी परिस्थिती निर्माण होत असल्याने बाजारपेठेत गोंधळाचे वातावरण निर्माण होते. याचा सर्वाधिक मनस्ताप स्थानिक नागरिक, वाहनचालक तसेच बाहेरून खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना सहन करावा लागतो.

ज्या दुकानदारांकडे स्वतः ची दुकाने आहेत, त्यांनी गणपती मूर्ती, पोळ्याचे साहित्य, सजावटीच्या वस्तू आणि इतर सणासुदीचे साहित्य दुकानाच्या हद्दीतच मांडावे. रस्त्यावर अनावश्यकपणे साहित्य वाढवून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

सणासुदीच्या काळात ग्राहकांची संख्या वाढणार असल्याने ग्रामपंचायतींनी बाजारपेठेतील वाहतूक व्यवस्था, पार्किंग आणि पादचाऱ्यांसाठी उपलब्ध जागा याबाबत योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. सणाचा उत्साह कायम ठेवताना बाजारपेठेतील मुख्य रस्ते मोकळे ठेवणे ही ग्रामपंचायत आणि व्यापारी दोघांचीही जबाबदारी आहे.

# वांबोरीतील नन्हे इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**दिव्य सार्वमंथन**
**वांबोरी | प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील नन्हे इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी एक दिवस शाळेचे व्यवस्थापन आणि अध्यापनाची जबाबदारी सांभाळली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत जाऊन इतर विद्यार्थ्यांना विविध शालेय विषयांचे धडे दिले. वर्गातील शिस्त, अध्यापनाची पद्धत, विद्यार्थ्यांशी संवाद तसेच शाळेतील विविध



जबाबदाऱ्या यांचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. यावेळी शिक्षक दिन का साजरा केला जातो, शिक्षक दिनाचे महत्त्व काय आहे, तसेच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मनीषा तोडमल व शीतल वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकांची वेशभूषा साकारली. संबंधित शिक्षकांची बोलण्याची पद्धत, अध्यापनाची शैली आणि व्यक्तिमत्त्व साकारण्याचा विद्यार्थ्यांनी केलेला प्रयत्न उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. त्यामुळे शाळेच्या परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल संस्थेच्या मुख्याध्यापिका तसेच अध्यक्षांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# आजारी वृद्धाचे अपहरण करून मालमत्ता हडपली

**दिव्य सार्वमंथन**
**अ. नगर | प्रतिनिधी**

आजारी वयोवृद्धाचे घरातून बळजबरीने अपहरण करून त्यांची स्थावर मालमत्ता, गाडी, दागिने आणि बँकेतील रोख रक्कम असा कोट्यवधींचा ऐवज लाटल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगरमध्ये उघडकीस आला.

याप्रकरणी सुरेश गणेश चितांबर (वय ७५, सध्या रा. पुणे) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ॲड. तेजस्वी तवले, मेधा यादव, रंजना झिने, प्रवीण बारस्कर, सचिन बारस्कर, महेश पवार, ज्ञानेश्वर सोनार आणि एका अज्ञात इसमावर विविध कलमान्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, सुरेश चितांबर यांच्या आजारपणाचा गैरफायदा घेत आरोपींनी संगनमत करून त्यांना राहत्या घरातून उचलून नेले. त्यानंतर त्यांची मिळकत बळकावण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात तोतया व्यक्ती उभा करून बनावट बक्षीसपत्र व साठेखत तयार केले. यावर बनावट स्वाक्षऱ्या करून खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली. तसेच आरोपींनी चितांबर यांच्या घरातून मुलीच्या लग्नासाठी ठेवलेले सोन्याचे दागिने, चांदीची व पितळेची भांडी, बँक खात्यातील २६ लाख ८० हजार रुपयांची रोख रक्कम, एटीएम कार्ड, लॉकरच्या चाव्या आणि शेव्हरलेट कंपनीची चारचाकी गाडी चोरून नेली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# ‘एक विश्व, एक परिवार’साठी संस्कार बदला

## तपोवनात कृष्णजन्माष्टमीचा जागर

**दिव्य सार्वमंथन**
**सोनगाव | प्रतिनिधी**

व्यक्ती बदलली तर समाज बदलेल आणि समाज बदलला तर विश्व परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करेल. 'एक विश्व, एक परिवार' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी प्रत्येकाने स्वतः च्या संस्कारांत सकारात्मक परिवर्तन घडवावे, असे आवाहन राजयोगिनी पद्मावती दीदी यांनी केले.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या तपोवनात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साह, भक्तिभाव आणि आध्यात्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी कलियुग परिवर्तनातून सत्युगी नवयुगाचा प्रारंभ होणार असून, या परिवर्तनाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी, असा संदेश देण्यात आला.

जन्माष्टमीचे आध्यात्मिक महत्त्व विशद करताना बी.के. सविता बहनजी यांनी श्रीकृष्ण



जन्माष्टमी हा केवळ धार्मिक उत्सव नसून सात्त्विक संस्कार, दैवी गुण आणि आत्मिक शक्ती जागृत करण्याचा दिवस असल्याचे सांगितले.

राजयोगिनी पद्मावती दीदी यांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील दैवी गुणांचे स्मरण करून परस्परांतील मतभेद दूर करणे, सकारात्मक संस्कार अंगीकारणे आणि संस्कारांचे मिलन घडवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. 'स्वतःमध्ये परिवर्तन घडवा आणि नवयुगाच्या निर्मितीत सहभागी व्हा,' असे आवाहन त्यांनी केले.

कोल्हार सेवाकेंद्रावरून आलेले राजयोगी शिवाजी भाईजी यांनी धकाधकीच्या जीवनातील ताणतणावावर मात करण्यासाठी ध्यानधारणेचे महत्त्व स्पष्ट केले. मन आणि बुद्धी परमात्मचिंतनात एकाग्र केल्याने अंतर्मनाला शांती व शक्ती मिळते. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही मन स्थिर ठेवण्याची शक्ती प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमातील श्रीकृष्णाची चैतन्य झांकी विशेष आकर्षण ठरली. कु. ऋत्वी शेजवळ हिने साकारलेल्या श्रीकृष्णाच्या भूमिकेने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्यात आली. ईश्वरीय प्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी बाळकृष्ण चोरमुंगे, नामदेव डुक्रे, मंगलाताई चोरमुंगे, अनिता व वैशाली वालझाडे, राधाताई व प्रतिभाताई जोर्वेकर, हिरानंदानी, कदम, शिंदे, संगीता सोनवणे, महिमा वालझाडे, अर्चना प्रधान, श्वेता सोनवणे, लकारे, डहारे, अजय कासार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून पान १ वरून

## विद्यार्थ्यांचा पुण्यात आक्रोश

विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची भूमिका घेतली. विद्यार्थ्यांच्या मागण्या ऐकून घेण्यासाठी सरकारने चर्चेसाठी जबाबदार व्यक्तीला आंदोलनस्थळी पाठवावे, अशी मागणी त्यांनी केली. विद्यार्थ्यांचे प्रश्न केवळ आश्वासनांनी सुटणार नसून त्यावर ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.दरम्यान, एमपीएससी परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली असून, परीक्षा पद्धती अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्याबाबत विद्यार्थ्यांसह विविध घटकांकडून सूचना घेण्यात येणार आहेत. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात ७ ते १० सप्टेंबरदरम्यान नागरिकांकडून सूचना स्वीकारण्यासाठी विशेष कक्षही सुरू करण्यात आला आहे. मात्र, 'आश्वासन नको, ठोस निर्णय हवा' अशी भूमिका घेत विद्यार्थी आंदोलनावर ठाम आहेत. अध्यक्ष-सचिवांचा राजीनामा, पेपरफुटीची सखोल चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि भविष्यात परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करण्याची मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे.

## श्रीगोंद्यात अडीच महिन्यांत ठेंगेचा ‘गाशा’!

संवेदनशील मानले जाणारे पोलीस ठाणे आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक मुलींचे मिसिंग व अपहरण पुण्याच्या घटना घडल्या होत्या त्यांनी शाळा महाविद्यालय जाऊन योग्य प्रबोधन न केल्याने मुलींच्या बाबतीत घटनेत वाढ झाली. त्यांच्या कार्यकाळात राहुरी तालुका मुलींचे बाबतीत बदनाम होऊन बसला आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक प्रकरणांवरून ते चर्चेत आले होते. मात्र राहुरीतील काही गंभीर गुन्ह्यांच्या तपासावरूनही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी पदभार स्वीकारताच वकील हत्याकांड, तीन अज्ञात ठिकाणी मृतदेह आढळण्याच्या घटना, त्या घटनेचा अद्याप छडा न लागणे,तसेच राहुरी शहरातील बुवा सिंध बाबा येथे छत्रपती शिवाजी महाराजांची विटंबना प्रकरणातील आरोपींचा शोध न लागणे, यांसारख्या मुद्द्यांवर तपासाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित झाल्याची चर्चा आहे. या प्रकरणांचा तपास आणि त्यातील पुढील कारवाईबाबत अधिकृत माहिती महत्त्वाची ठरणार आहे. ठेंगे यांच्या पुणे बदलीची माहिती समोर आल्यानंतर आता सर्वाधिक चर्चा एका प्रश्नाची आहेही बदली पूर्णपणे प्रशासकीय होती की श्रीगोंद्यातील घडामोडींनंतर परिस्थितीचा त्यावर काही परिणाम झाला? अधिकाऱ्यांच्या बदल्या या प्रशासनातील नियमित बाब आहेत. श्रीगोंद्यात अडीच महिन्यांचा कार्यकाळ आणि राहुरीत अडीच वर्षांचा मुक्कामया दोन कालखंडांमधील मोठा फरक सध्या चर्चेचा विषय बनला आहे.

## ‘भारत संसद’च्या नावाने कारवर राजमुद्रा अन् कमळ!

होणे गरजेचे असल्याची मागणी पुढे येत आहे. विशेष म्हणजे, हे वाहन अधिकृत संसदीय वापरासाठी आहे की केवळ वैयक्तिक वापरातील वाहनावर हे लोगो लावण्यात आले आहेत? याबाबत अद्याप स्पष्टता नाही.दरम्यान, या प्रकरणावर संबंधित वाहनमालक अथवा खासदार रामराव वडकुते यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.मात्र हि गाडी ऑनलाईन माहिती घेतली असता सागर विजयकुमार गुप्ता परभणी असे दिसत आहे. त्यामुळे सध्या या प्रकरणातील कोणताही आरोप अंतिम सत्य मानता येणार नाही. मात्र, 'भारत संसद', राजमुद्रा आणि कमळाच्या चिन्हामुळे निर्माण झालेल्या या प्रश्नांची अधिकृत चौकशी होणार का? याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. राहुरीत या कारने केवळ रस्त्यावरून प्रवास केला नाही, तर आता ती राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी बनली आहे!

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार मेन बाजार
(ओपन) या (क्लोज)
सोमवार ते शनिवार Date : 7/09/26

| | | | |
|---|---|---|---|
| 5 168 690 780 | 0 136 145 235 | 2 138 147 156 | 7 124 278 458 |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 3 120 247 256 | 8 170 279 567 |
| 7 124 278 458 | 2 237 390 679 | 4 130 239 356 | 9 360 450 469 |
| 8 125 134 350 | 3 580 670 689 | 5 140 249 348 | 0 389 479 569 |
| 9 270 360 450 | 4 149 158 257 | 6 259 358 457 | 1 290 380 470 |
| 0 127 136 370 | 5 140 348 456 | 7 160 269 368 | 2 345 390 589 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 7.9.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार मेन मुंबई
(ओपन) या (क्लोज)
100% Date Fix FREE GAME Open to Close
सोमवार ते मंगळवार: 4 338 699 9 388 144 — 40 - 45 x 90 - 95
बुधवार ते गुरुवार: 5 366 447 0 118 299 — 51- 56 X 01- 06
शुक्रवार ते शनिवार: 1 227 588 6 277 330 — 12 - 17 x 62 - 67
साप्ताहिक: 2 336 499 7 188 449 — 23 - 28 X 73 - 78
साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23
विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

घर विकणे आहे
राहुरी शहरातील बिरोबा नगर परिसरात ८५० स्क्वेअर फुट बांधकाम असलेले घर विकणे आहे.
संपर्क: ९७३०१५१६०६
(२८ ऑगस्ट)

मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा
मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६
(०६ डिसेंबर)

# पदासाठी नव्हे, पक्षासाठी काम करा

## कार्यकर्त्यांनी स्वत:हून पुढाकार घ्यावा : डॉ. सुजय विखे पाटील

### जिल्हा भाजपा कार्यकारिणी बैठकीत संघटन बळकटीकरणाचा निर्धार; शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन

**दिव्य सार्वमंथन**
**अ. नगर | प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केवळ पक्षाच्या आदेशाची वाट न पाहता जनतेच्या प्रश्नांवर आणि शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे. पद मिळविण्यासाठी नव्हे, तर पक्षासाठी काम करण्याची मानसिकता प्रत्येक कार्यकर्त्याने ठेवली पाहिजे, असे आवाहन भाजपा प्रदेशउपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार अहिल्यानगर येथे आयोजित भाजपा जिल्हा कार्यकारिणी बैठकीत डॉ. विखे पाटील यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबरोबरच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेचे उदाहरण देताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, सरकारने एखादी योजना जाहीर केल्यानंतर केवळ त्याची माहिती देणे पुरेसे नाही. त्या योजनेचा लाभ नेमक्या कोणत्या शेतकऱ्याला मिळाला, हे त्याच्यापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही कार्यकर्त्यांनी स्वीकारली पाहिजे. यावेळी त्यांनी आवर्जून शिर्डी विधानसभा मतदारसंघातील गावागावांमध्ये सोसायट्यांच्या माध्यमातून कर्जमाफीच्या लाभार्थ्यांची यादी घेऊन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या छायाचित्रांसह लाभाची रक्कम नमूद असलेली पत्रे तयार करून ती प्रत्येक लाभार्थ्याच्या घरापर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले. "एखाद्या शेतकऱ्याला दीड–दोन लाख रुपयांचा लाभ मिळत असेल, तर हा लाभ कोणामुळे मिळाला याची जाणीव त्याला करून देणे आवश्यक आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

पक्षाने दिलेली विविध पदे ही केवळ नावापुरती किंवा प्रतिष्ठेसाठी नसून त्यातून पक्षाचे काम झाले पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका डॉ. विखे पाटील यांनी मांडली. जिल्हा नियोजन समितीसह विविध पदांवर नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या कार्यक्रमांना आणि कार्यकारिणीच्या बैठकांना गांभीर्याने उपस्थित राहून आपली सक्रियता दाखवावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच तालुकाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, मोर्चांचे पदाधिकारी, सरचिटणीस तसेच बूथस्तरावरील कार्यकर्ते यांचे पक्षासाठीचे योगदान आणि प्रत्यक्ष कामाचे मूल्यमापन झाले पाहिजे. पक्षासाठी वेळ देणाऱ्या आणि स्वत:हून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पुढे आणण्याची जबाबदारी नेतृत्वाची आहे, असेही त्यांनी सांगितले.



भाजपच्या कार्यपद्धतीचा मूलमंत्र 'राष्ट्र प्रथम, पक्ष नंतर आणि मी शेवटी' हा आहे. मात्र व्यक्तिगत स्वार्थाला पक्षापेक्षा प्राधान्य देण्याची प्रवृत्ती वाढणे योग्य नाही. नेत्यांप्रती वैयक्तिक निष्ठा असली तरी सर्वप्रथम निष्ठा भारतीय जनता पक्षाशी असली पाहिजे, असे डॉ. विखे पाटील यांनी ठामपणे सांगितले मंत्रीपद, पालकमंत्रीपद, आमदारकी, खासदारकी किंवा कोणतेही पद पक्षामुळे मिळते. त्यामुळे आपली पहिली निष्ठा पक्षाशी आणि त्यानंतर नेता किंवा लोकप्रतिनिधीशी असली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आपल्या राजकीय प्रवासात कार्यकर्त्यांना बळ देण्याला नेहमीच प्राधान्य दिले. स्वत:ला एखादे पद मिळविण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो; मात्र आपल्या कार्यकर्त्याला पदावर पोहोचविण्यासाठी आपण त्यापेक्षा कमी प्रयत्नातही समाधान मानले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. मी मोठा होण्यापेक्षा माझा कार्यकर्ता मोठा झाला, यातच मला आनंद आहे, असा संदेश देत त्यांनी पदाच्या मागे धावण्यापेक्षा संघटनेत कार्यकर्ते निर्माण करण्याचे आवाहन केले.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्याचा प्रश्न मांडताना डॉ. विखे पाटील यांनी डिंबेमाणिकडोह बोगदा, कुकडी कालव्यांचे नूतनीकरण आणि साकलाई योजनेचा उल्लेख केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नांतून जिल्ह्याच्या पाण्याच्या प्रश्नाला निर्णायक दिशा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कुकडी कालव्यांच्या नूतनीकरणासाठी मोठ्या निधीची तरतूद होऊन निविदा व कार्यादेशाची प्रक्रिया पुढे गेल्याचा उल्लेख करत, आपल्या मुलाबाळांचा आणि आपल्या हक्काच्या पाण्याचा हा प्रश्न आहे. एक पाऊल पुढे टाकले आहे; आता मागे हटायचे नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर महानगरपालिकेत भाजपचे २५ नगरसेवक निवडून आल्याचा उल्लेख करत डॉ. विखे पाटील यांनी पक्षाची संघटनात्मक ताकद वाढत असल्याचे सांगितले. हीच ताकद आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कायम ठेवण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने पूर्ण क्षमतेने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. याच ताकदीने आपण लढत राहिलो तर जिल्हा परिषदेच्या ७५ पैकी ६० जागा भाजपच्या येतील आणि अहिल्यानगर जिल्हा परिषद अध्यक्षपदही भाजपकडे येईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सरकारच्या योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविणे, जनतेशी सातत्याने संपर्क ठेवणे, कार्यकर्त्यांना सन्मान व बळ देणे आणि पक्षाची संघटनात्मक ताकद तळागाळापर्यंत वाढविणे, या उद्देशाने सर्व पदाधिकाऱ्यांनी काम करण्याचा संदेश या बैठकीतून देण्यात आला.

बैठकीस दक्षिण अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, अहिल्यानगर शहराध्यक्ष अनिलजी मोहिते, उत्तर नगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, उपमहापौर धनंजय भैय्या जाधव यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, विविध मोर्चा व आघाड्यांचे प्रमुख आणि भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते ओबीसी युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

## थोडक्यात

### नवनाथ पाटील यांचे निधन



दिव्य सार्वमंथन ✍ राहुरी फॅक्टरी । येथील प्रसादनगर भागातील रहिवासी नवनाथ बाबुराव पाटील (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, तीन मुले, मुलगी, पुतणे व पुतणी असा मोठा परिवार आहे. दत्ता, बाळकृष्ण व नंदकिशोर पाटील यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### पोलीस उपनिरीक्षक हंडाळ यांचे सात्रळ येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



दिव्य सार्वमंथन ✍ सोनगाव । "स्वावलंबनाच्या बळावर आणि संघर्षातून घेतलेले शिक्षण आयुष्याला खऱ्या यशाची दिशा देते. गरिबीतून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हे सर्वांत प्रभावी माध्यम असून, स्वत:चा उत्कर्ष साधतानाच समाजाचा आणि देशाचाही विकास घडविता येतो," असे प्रतिपादन श्रीरामपूरचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब हंडाळ यांनी केले. सात्रळ (ता. राहुरी) येथील रयत शैक्षणिक संकुलात गुरुकुल प्रकल्पांतर्गत बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आप्पासाहेब हंडाळ यांनी आपल्या जीवनातील संघर्ष आणि स्वावलंबनाचा अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना शिक्षण व आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी, अभ्यासाचे नियोजन आणि ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, कर्मवीर भाऊराव पाटील व थोर स्वातंत्र्यसैनिक कॉ. आप्पासाहेब कडू पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. मान्यवरांचा सत्कारही करण्यात आला. प्राचार्य सिताराम गारुडकर यांनी स्वागत करून पाहुण्यांचा परिचय करून दिला तसेच शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील यांनी विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या अनुभवातून प्रेरणा घेऊन जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन केले. यावेळी किरण कडू पाटील, प्रभाकर पलघडमल, भाऊसाहेब पलघडमल, संजय पलघडमल, योगेश पलघडमल, संतोष पलघडमल, आकाश पलघडमल, दीपक पलघडमल, योगेश शशिकांत पलघडमल, नामदेव पलघडमल, सतीश शिंदे, सुनील सात्रळकर, मुख्याध्यापिका विद्या ब्राह्मणे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख विद्या गोडगे तसेच शिक्षक, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सलमा पठाण यांनी केले, तर आभार रामदास तांबे यांनी मानले.

# राहुरीत वीर गोगाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात

### गटनेते हर्ष तनपुरे यांच्या उपस्थितीत मिरवणुकीला प्रारंभ

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी | प्रतिनिधी**

महायोगी श्री गोरक्षनाथ यांचे परमशिष्य, लोकदैवत तसेच वाल्मीक समाजाचे कुलदैवत व आराध्यदैवत वीर गोगाजी महाराज (जाहरवीर) यांचा जन्मोत्सव राहुरी येथे मोठ्या उत्साहात, शिस्तीत आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी राहुरी नगरपरिषदेचे गटनेते हर्ष तनपुरे यांच्या उपस्थितीत मिरवणुकीला सुरुवात झाली. अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही पारंपरिक धार्मिक परंपरा यंदाही वाल्मीक समाजाच्या वतीने श्रद्धापूर्वक जपण्यात आली.

वीर गोगाजी महाराज हे राजस्थानमधील चौहान वंशाचे राजे होते. सामाजिक व धार्मिक एकतेचे प्रतीक म्हणून त्यांना मानले जाते. हिंदू बांधव त्यांना गोगाजी महाराज, तर मुस्लिम बांधव गोगा पीर किंवा जाहर पीर म्हणून श्रद्धेने पुजतात. राजस्थानातील हनुमानगड जिल्ह्यातील गोगामेडी हे त्यांचे प्रमुख तीर्थक्षेत्र आहे.

जन्मोत्सवानिमित्त श्रावण महिन्यात वाल्मीक समाजातील भाविकांकडून २१ दिवसांची कठीण उपासना केली जाते. गुरू गोरक्षनाथांनी गोगाजी महाराजांना दिलेली पवित्र छडी (निशाण) या उपासनेचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. या काळात भाविक चप्पल न घालणे, गादी किंवा पलंगावर न बसणे तसेच ब्रह्मचर्याचे पालन करणे यांसारखे कठोर नियम पाळतात.



या धार्मिक परंपरेची सांगता ५ सप्टेंबर रोजी राहुरी शहरात भव्य मिरवणुकीने करण्यात आली. भगीरथी शाळेसमोरील श्री गोरक्षनाथ व गोगादेव मंदिरापासून मिरवणुकीला सुरुवात झाली. शनी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि शुक्लेश्वर चौक मार्गे मिरवणूक शांततेत व उत्साहात पार पडली.

मिरवणुकीनंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत २१ दिवसांच्या उपवासाची सांगता केली. संपूर्ण कार्यक्रमात भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकतेचे वातावरण पाहायला मिळाले.

हा जन्मोत्सव, छडी पूजन व मिरवणूक यशस्वी करण्यासाठी स्वर्गीय सुनील भगत निशाण आखाडा, सकल पंच (सोनू भगत) टीकायती, गुलशन बिवाल (भंडारी), पवन उमरवाल (खलिफा), यश बिवाल, पापाभाई बिवाल, संतोष बिवाल, सुनील बुंबक तानसेन बिवाल, विजू बिवाल, गुड्डू सोलंकी, करण बुंबक, देवेंद्र सोलंकी, संजय सोनारकर, रोहित बिवाल, शिवम बिवाल, देवीदास बिवाल, निखिल बिवाल, ओम लहरे, गौतम बिवाल, साहिल बिवाल, प्रीतम सोनारकर, गणेश सोलंकी यांच्यासह वाल्मीक समाजातील नागरिक व तरुण मंडळांनी विशेष परिश्रम घेतले.

# विश्वासाच्या २६ वर्षांची यशस्वी वाटचाल ज्योती क्रांती मल्टिस्टेटचा वर्धापनदिन उत्साहात

### सेवा, सहकार्य आणि प्रगतीची परंपरा कायम ठेवण्याचा संकल्प; राहुरी शाखेत मान्यवरांचा उत्स्फूर्त सहभाग

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी | प्रतिनिधी**

विश्वास, सेवा, सहकार्य आणि प्रगतीची अखंड परंपरा जपत ग्राहकांच्या विश्वासाला प्राधान्य देणाऱ्या ज्योती क्रांती मल्टिस्टेटने यशस्वी वाटचालीची २६ वर्षे पूर्ण केली. या निमित्ताने राहुरी शाखेत संस्थेचा २६ वा वर्धापनदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

वर्धापनदिनानिमित्त शाखेत उपस्थित मान्यवर तसेच शिक्षकवृंद यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ज्योती क्रांती मल्टिस्टेटच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव करत संस्थेच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



'विश्वासाची २६ वर्षे प्रगतीची अनंत वर्षे!' या भावनेतून ज्योती क्रांती मल्टिस्टेटने ग्राहकांशी असलेले विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास राहुरी शाखेच्या मॅनेजर उषा शिरसाठ, कॅशियर किरण गुंजाळ, शाखा विकासक कृष्णा पोपळघट, फिल्ड ऑफिसर शरद मगर, क्लार्क पूनम झेंडे, दैनिक एजंट अशोक काळे, तसेच सतीश लोंढे, किशोर गाडेकर, धनंजय वाघमारे यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते. ज्योती क्रांती मल्टिस्टेटच्या २६ वर्षांच्या प्रवासात ग्राहकांचा विश्वास, कर्मचारी वर्गाचे योगदान आणि सहकार्य यांचा महत्त्वाचा वाटा राहिला असून, आगामी काळातही सेवा आणि प्रगतीची ही परंपरा अधिक व्यापक करण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# बळीराजाचा बैल पोळा डोळ्यांत पाणी आणणारा



**दिव्य सार्वमंथन**
**पाथर्डी | प्रतिनिधी**

पावसाने पाठ फिरवल्याने शेतात हिरवळ नाही चाऱ्याचा प्रश्न गंभीर आहे आणि शेतीच्या खर्चाने शेतकऱ्याची आर्थिक कोंडी झाली आहे. अशा दुष्काळाच्या झळा सोसत असतानाही वर्षभर आपल्या सोबत राबणाऱ्या बैलाप्रती शेतकऱ्यांची माया मात्र तसूभरही कमी झालेली दिसत नाही.

पोळ्याच्या निमित्ताने खरवंडी कासार येथील आठवडे बाजारात शेतकऱ्यांची लगबग दिसत आहे. घरची परिस्थिती हलाखीची असली तरी बैलांचा सण साधेपणाने का होईना पण आनंदाने साजरा करायचा ही बळीराजाची भावना बाजारात दिसून येत आहे.

पाऊस नाही पीक नाही पण बैलांनी माझ्या राजानी वर्षभर साथ दिली त्यांचा पोळा तरी आनंदाने साजरा करणारच अशी भावनिक प्रतिक्रिया अनेक शेतकरी व्यक्त केली दुष्काळाने शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला असला तरी मातीशी आणि आपल्या पशुधनाशी असलेले नाते आजही घट्ट असल्याचे पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर दिसून येत आहे.

# सामाजिक कार्यकर्ते शौकत इनामदार यांना राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार

### शिर्डीत 'बी द चेंज फाउंडेशन'तर्फे सन्मान; मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

**दिव्य सार्वमंथन**
**मानोरी | प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील सामाजिक कार्यकर्ते शौकत बबनभाई इनामदार यांच्या सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना 'बी द चेंज फाउंडेशन'तर्फे राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार २०२६ जाहीर करून सन्मानित करण्यात आले आहे. शिर्डी येथे आयोजित राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला.

शौकत इनामदार हे सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असून, विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजासाठी उल्लेखनीय योगदान देत आहेत. महाराष्ट्र शासनाने गौरविलेल्या आदर्श बारागाव नांदूर व इतर १५ गावांच्या प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून सुमारे ७० हजार लोकसंख्येला शुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेवर सन २००२ पासून योजना निरीक्षक व व्यवस्थापक म्हणून त्यांनी कार्य केले आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याच्या कामात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे.

कोरोना महामारीच्या काळात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन २०२१ मध्ये सरपंच सेवा संघाच्या वतीने त्यांना 'आदर्श कर्मचारी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले होते. संकटाच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या त्यांच्या कार्याचे यावेळी विशेष कौतुक झाले.



तसेच सन २०२२ मध्ये मुस्लिम जमात पंचकमिटी, बारागाव नांदूर येथे अध्यक्षपदी समाजाच्या वतीने त्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत समाजासाठी भरीव कार्य केले.

त्यांच्या या कार्याची दखल घेत ग्लोबल स्कॉलर फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने 'समाजभूषण पुरस्कार २०२४' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत आधार फाउंडेशन व एस.आर. २४ न्यूज वृत्तवाहिनीच्या वतीने सन २०२६ मध्ये 'समाज भूषण पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

सामाजिक कार्यातील सातत्य, समाजाच्या विविध प्रश्नांबाबत असलेली संवेदनशीलता आणि सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील योगदान या सर्व बाबींचा विचार करून 'बी द चेंज फाउंडेशन'ने राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कारासाठी शौकत इनामदार यांची निवड केली. शिर्डी येथे झालेल्या या पुरस्कार सोहळ्यात त्यांना गिफ्ट, ट्रॉफी, शाल, प्रमाणपत्र तसेच पारंपरिक महाराष्ट्रियन फेटा देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कारामुळे बारागाव नांदूरसह राहुरी तालुक्याच्या सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली आहे. शौकत इनामदार यांच्या कार्याचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. समाजासाठी सातत्याने कार्य करण्याची प्रेरणा देणारा हा सन्मान असून, आगामी काळातही सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रांत अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा त्यांचा मानस आहे.

पाहिजेत
सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी
अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात
न्युज रिपोर्टर व कॅमेरामन
जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
दै. सार्व मंथन कार्यालय,
तनपुरेवाडी रोड, अनमोल गणपती मंदिरासमोर,
राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072

दैनिक दिव्य सार्वमंथन
नवी दिशा, नवी आशा
सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६ पान ०४

दैनिक दिव्य सार्वमंथन नवी दिशा, नवी आशा
राज्यात कुठेही मिळवा घरपोच 'दैनंदिन अंक'
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, उद्योग तसेच विविध क्षेत्रांतील दर्जेदार लेख व बातम्या नियमितपणे वाचण्यासाठी आजच अंक बुक करा
घरपोच अंक मिळवण्यासाठी आजच संपर्क साधा.
दै. सार्व मंथन कार्यालय,
तनपुरेवाडी रोड, अनमोल गणपती मंदिरासमोर, राहुरी, जि. अ.नगर.
मो. 9822544072, 9822649346, 9370948911, 9767271094

## मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

मोदी फडणवीसांमुळे भाजपला चांगले दिवस–राम शिंदे

**– पण सर्वसामान्यांच्या दिवसांचे काय? प्रत्येकजण रडकुंडीला आलाय... राज्य व देश मात्र विकासाच्या दिशेने वाटेवर तुफानी वेगात धावत आहेत?**

नियम जुनेच, मी फक्त काटेकोरपणे राबवतोय–तुकाराम मुंढे

**– त्यामुळेच घटनाकार म्हणाले होते कि, संविधानाचा वापर जर योग्य रितीने झाला तर 'सर्वसामान्य' सुखी व समाधानी! पण वापर करणारा लायक नसेल (नालायक असेल)तर...?**

दिल्लीत विध्यार्थ्यांच्या वसतिगृहाची इमारत कोसळली–वृत्त

**– जे कोसळायला हवे?ते कोसळत नाही...? देशभरातील विद्यार्थ्यांच्या मागे साडेसाती लागलीय?**

हादरे व खड्ड्यांविरोधात पुणेकरांचे आंदोलन–वृत्त

**– खरोखर राहुरीकरांना 'संवेदनशील' व 'समंजस' म्हणावे लागेल? शहरातील रस्त्यावरून चालताना गेल्या अनेक वर्षांपासून हादरे बसतात पण बिचारे...?**

डॉल्बीमुळे अटॅक येऊ शकतो–राज ठाकरे

**– ज्या पद्धतीने टोलनाके बंद पाडले? त्याच पद्धतीने डीजे च्या आवाजावर मर्यादा आणा ना?**

# बॉसने सांगितलं म्हणजे गोष्ट संपली! : सुजय विखे

## 'वाद होत असतील तर मला खुर्ची नको'; फडणवीसांच्या निर्णयालाच अंतिम मानणार

**दिव्य सार्वमंथन**
**अ.नगर | प्रतिनिधी**

जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकारणात अध्यक्षपदाची चर्चा रंगली असताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या भूमिकेवरून राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. जिल्ह्यातील नेत्यांमध्ये माझ्या नावावर सहमती होत नसेल आणि त्यावरून वाद होत असतील, तर मला जिल्हा बँकेच्या पदावर बसण्याची कोणतीही इच्छा नाही, असे स्पष्ट करत त्यांनी पक्षश्रेष्ठींच्या निर्णयालाच सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले.

रविवारी नगरमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. विखे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाकडे बोट दाखवले. या खुर्चीवर तोच बसेल, ज्याचे नाव देवेंद्र फडणवीस सांगतील. बाकी राहाता, कर्जत–जामखेड किंवा काँग्रेसच्या नेत्यांना काय वाटते, याला अर्थ नाही. राज्याचे मुख्यमंत्री आमचे सर्वे सर्वा आहेत, अशी रोखठोक भूमिका त्यांनी मांडली.

बॉसने बोल दिया होने का, तो होने का! या मिश्कील पण स्पष्ट शब्दांत त्यांनी पक्षातील अंतिम निर्णयाची दिशा स्पष्ट केली. त्यामुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या चर्चेला आता नव्या राजकीय रंगाची किनार मिळाली आहे.



'प्रत्येक निवडणुकीत माझंच नाव पुढे येतं!'

आपल्या नावाभोवती सुरू असलेल्या चर्चेवर भाष्य करताना डॉ. विखे म्हणाले, कुठलीही निवडणूक लागली की माझं नाव येतं; पण मला काही मिळत नाही. गेल्या सहा–सात महिन्यांपासून हेच सुरू आहे. विधानसभा लागली तर सुजय विखे आमदारकीला, विधान परिषद लागली तर सुजय विखे आमदारकीला आणि जिल्हा बँक लागली तरी माझंच नाव पुढे येतं. जिल्हा परिषदेत आरक्षण पडलं नसतं तर तिथेही माझंच नाव चालवलं असतं. त्यांच्या या वक्तव्यामुळे जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांबाबत चर्चेला चांगलेच उधाण आले आहे.

जिल्हा बँकेचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. विखे यांनी सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींनी ही संस्था चालविणे योग्य असल्याचे मत व्यक्त केले. जिल्हा बँक ही शेतकऱ्यांच्या अस्मितेची आणि जिव्हाळ्याची संस्था आहे. सहकार क्षेत्रातील लोकांनी ती चालवली तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल. राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना सहज कर्ज देत नाहीत; मात्र अहिल्यानगर जिल्हा बँकेने शेतकऱ्यांना नेहमीच आधार दिला आहे, असे त्यांनी सांगितले.

भोसाखिंड बोगद्याच्या कामावरून सुरू असलेल्या श्रेयवादावरही डॉ. विखे यांनी भाष्य केले. भोसाखिंड बोगदा होण्यासाठी प्रत्येक आमदाराचे योगदान आहे. दक्षिणेतील आमदारांनी आपापल्या परीने प्रयत्न केले आहेत. राष्ट्रवादीच्या आमदारांनी काय प्रयत्न केले याची मला माहिती नाही; मात्र ते सांगत असतील तर त्यांच्याकडे त्याचा काही पुरावा असेल, असे ते म्हणाले.

हा विषय श्रेयवादाचा नाही. राज्यातील सर्व आमदार मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली काम करतात, असे सांगत त्यांनी श्रेयाच्या राजकारणाला फारसे महत्त्व नसल्याचे स्पष्ट केले.

नगर–करमाळा मार्ग तसेच नगर शहरातील उड्डाणपुलाच्या कामाचा पाठपुरावा आपण केल्याचे सांगताना, काम मार्गी लावले; मात्र त्या कामाच्या श्रेयाचे रूपांतर मतांमध्ये होते की नाही, हे सांगता येणे कठीण आहे, अशी मिश्कील टिप्पणीही डॉ. विखे यांनी केली.

डॉ. विखेंच्या या रोखठोक भूमिकेमुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी पक्षश्रेष्ठी नेमका कोणता चेहरा पुढे करणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# गोविंदांचा जयघोष अन् कृष्णनामाच्या गजराने दुमदुमली राहुरी

## दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांची जोरदार एन्ट्री



**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी | प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधत राहुरी शहरात दहीहंडी उत्सवाचा अक्षरशः जल्लोष पाहायला मिळाला. शहरातील विविध मित्र मंडळांच्या वतीने ठिकठिकाणी दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. ढोल–ताशांचा गजर, गोविंदा रे गोपाळा येशोदेच्या कान्ह्या बाळा या जयघोष, गोविंदाच्या उत्साहपूर्ण घोषणांनी दहीहंडी फोडण्याच्या थराराने संपूर्ण राहुरी शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.

विविध मित्र मंडळांच्या गोविंदा पथकांनी शहरातील दहीहंडी उत्सवात सहभाग घेत एकापाठोपाठ एक दहीहंड्या फोडत विजयाचा जल्लोष केला. गोविंदांच्या थरावर थर रचण्याच्या चित्तथरारक क्षणांना उपस्थित नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणांनी दाद दिली.

राहुरी शहरातील पाटील मेन्सवेअर, शनी चौक येथे आमदार प्राजक्त तनपुरे मित्र मंडळ, नविपेठ व्यापारी मंडळ, दैनिक सार्वमंथन कार्यालय व स्वराज्य फाउंडेशनच्या वतीने, तसेच स्टेशन रोड, तनपुरेवाडी, आझाद मंडळ, वेंकटेश मंडळ, मळगंगा मंडळ, मठगल्ली, शिवाजी चौक मित्र मंडळ, श्री दत्त मंडळ, श्री रामदत्त मंडळ, गजानन मंडळ, अंबिका मंडळ आणि राहुरी नगरपरिषद यांच्या वतीने दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील विविध भागांमध्ये दिवसभरापासूनच उत्सवाची लगबग सुरू होती. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांची रंगतदार एन्ट्री होताच नागरिकांची मोठी गर्दी जमली. ढोल–ताशांच्या तालावर तरुणाईचा उत्साह शिगेला पोहोचला आणि दहीहंडी फुटताच परिसरात एकच जल्लोष होत होता.

दरम्यान, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी राहुरी पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुळशीराम गीते, पोलीस कर्मचारी जयदीप बडे यांच्यासह इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी शहरातील विविध चौकांमध्ये बंदोबस्त ठेवत उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी विशेष खबरदारी घेतली.

भक्ती, थरार, उत्साह आणि जल्लोषाचा अनोखा संगम ठरलेल्या राहुरीतील दहीहंडी उत्सवाने यंदाही शहराच्या उत्सवी परंपरेत आणखी एक रंग भरला. तर दहिहांडी मित्र मंडळाचे नरेंद्र शिंदे यांचे ठिक ठिकाणी स्वागत करण्यात आले.




# वांबोरीत विहिरीत मृत अवस्थेत बिबट्या आढळला

## शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण; उपाययोजनेची मागणी

**दिव्य सार्वमंथन**
**वांबोरी | प्रतिनिधी**

वांबोरी गावातील गडाख वस्ती, कुक्कडवेढे रोड परिसरात संदीप दत्तात्रय गडाख हे विहिरीतील पाणी पाहण्यासाठी गेले असता त्यांना विहिरीमध्ये बिबट्या मृत अवस्थेत आढळून आला. त्यांनी तातडीने वांबोरी पोलीस स्टेशन व वन विभागाशी संपर्क साधून माहिती दिली.



दरम्यान, मागील काही दिवसांपासून वांबोरी परिसरात बिबट्याच्या हालचाली व हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. संध्याकाळच्या वेळेला शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांवर बिबट्यांकडून हल्ले होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

त्यातच सुरू झालेल्या लोडशेडिंगमुळे संध्याकाळच्या वेळेला वीजपुरवठा नसल्याने शेत परिसरात अंधार होत आहे. त्यामुळे पाळीव जनावरे सांभाळताना शेतकऱ्यांना अधिक धोका निर्माण झाला असून, बिबट्याचा बंदोबस्त करण्याची तसेच शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# 'नांदू नको, नवऱ्याचे कुठेतरी अफेअर आहे' म्हणत महिलेला मारहाण

## चुलत भाऊ–चुलतीविरोधात कोपरगाव पोलिसांत तक्रार

**दिव्य सार्वमंथन**
**कोपरगाव | प्रतिनिधी**

कोपरगाव तालुक्यातील दाऊच खुर्द येथे कौटुंबिक वादातून एका महिलेला चुलत भाऊ व चुलतीने शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून, संबंधित महिलेने कोपरगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

सौ. लता संतोष साळवे (वय ३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा चुलत भाऊ दत्तू नारायण आरणे आणि चुलती अलका नारायण आरणे यांनी त्यांना घाणघाण शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच, 'तू माझ्या बायकोला नांदू नको, माझे कुठेतरी अफेअर आहे असे सांगून शिकवतेस,' असा आरोप करत आपल्याशी वाद घातल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

यावेळी आरोपींनी पीडित महिलेच्या सख्ख्या भावालाही मारहाण केल्याचा आरोप असून, 'येथे राहायचे नाही, तुम्हा सगळ्यांना सोडणार नाही,' अशा शब्दांत धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेनंतर पीडित महिलेने कोपरगाव पोलीस ठाणे गाठून घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. त्यांच्या तक्रारीवरून दत्तू नारायण आरणे व अलका नारायण आरणे यांच्याविरुद्ध एनसीआर नोंद करण्यात आली असून, पुढील कार्यवाही पोलीस करीत आहेत.

# मुळा धरणग्रस्तांचे पाणी बंद आंदोलन तात्पुरते स्थगित

## आ. प्राजक्त तनपुरे यांच्या शिष्टाईला यश; आठ दिवसांत मुंबईत चार मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे आश्वासन

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी | प्रतिनिधी**

गेल्या ६५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुळा धरण प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी मुळा धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीने ८ सप्टेंबर रोजी पुकारलेले पाणी बंद आंदोलन आ. प्राजक्त तनपुरे यांच्या शिष्टाईनंतर तात्पुरते स्थगित केले आहे. प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेणे, पुनर्वसन, नवीन दाखले मिळण्यातील अडचणी तसेच दळणवळणाच्या प्रश्नांसह अन्य मागण्यांवर मुंबई येथे आठ दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात आले आहे.

या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री दत्तात्रेय मामा भरणे, उद्योगमंत्री उदय सामंत तसेच मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चा होणार आहे.

मुळा धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घ्यावे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करावे, नवीन दाखले मिळण्यातील अडचणी दूर कराव्यात तसेच दळणवळणाच्या समस्या सोडवाव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी यशवंत सेनेचे जिल्हाप्रमुख विजय तमनर व वावरथचे माजी सरपंच ज्ञानेश्वर बाचकर यांच्या नेतृत्वाखाली ८ सप्टेंबर रोजी पाणी बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.




या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महापालिका, एमआयडीसी, राहुरी नगरपालिका, देवळाली प्रवरा नगरपालिका यांच्यासह विविध गावांचा पाणीपुरवठा बेमुदत बंद करण्याचा निर्णय समितीने घेतला होता. आंदोलनाबाबतची निवेदने राहुरीचे आ. अक्षय कर्डिले, आ. प्राजक्त तनपुरे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह संबंधित विभागांच्या मंत्र्यांना देण्यात आली होती.

आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर आ. प्राजक्त तनपुरे यांनी मुंबई येथे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची शिष्टमंडळासह भेट घेतली. यावेळी विखे पाटील यांनी प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न सोडविण्यासाठी बैठक घेण्याचे आश्वासन दिले. मात्र, समिती आंदोलनावर ठाम असल्याने ५ सप्टेंबर रोजी राहुरी येथील अहिल्याभवन येथे आ. तनपुरे यांनी प्रकल्पग्रस्तांची बैठक बोलावली.

यावेळी आ. तनपुरे म्हणाले की, मुळा धरणग्रस्तांचा त्याग मोठा आहे. त्यांच्या त्यागातूनच धरणाखालील अनेक तालुके विकसित झाले आहेत. त्यांच्या प्रत्येक मागणीला माझा पाठिंबा आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी माझी चर्चा झाली असून मुळा धरणग्रस्तांना कृषी विद्यापीठासह अन्य ठिकाणी कशा पद्धतीने सामावून घेता येईल, याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे.

पुढील आठवड्यात संबंधित सर्व विभागांच्या मंत्र्यांना एकत्रित करून २०२५ मध्ये झालेली अपूर्ण बैठक पूर्ण करण्यात येईल आणि प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीसह विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वास तनपुरे यांनी व्यक्त केला.

या बैठकीस यशवंत सेनेचे जिल्हाप्रमुख विजय तमनर, वावरथचे माजी सरपंच ज्ञानेश्वर बाचकर, बाजार समितीचे माजी उपसभापती रामदास बाचकर, मुळा धरणग्रस्त कृती समितीचे मारुती बाचकर, दिलीप गाडे, ठकाजी बाचकर, अशोक बाचकर, कोंडीराम बाचकर, अहिल्यादेवी प्रतिष्ठानचे भारत मतकर, पळशीचे सरपंच गणेश मधे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल डोलनर यांनी केले.

दैनिक दिव्य सार्वमंथन नवी दिशा, नवी आशा
दैनिक सार्वमंथन हे वृत्तपत्र मालक प्रकाशक सौ. सपना अनिल कोळसे यांनी मुद्रक श्री अनिल गंगाधर कोळसे यांच्या स्वराज प्रेस आणि प्रिंटिंग, गट नं. ५९३, कोळसे निवास, कोळसे दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र – ४१३७०५ येथे छापून सर्वे. नं ५९३, दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र ४१३७०५ येथे प्रकाशित केला. संपादक – श्री अनिल गंगाधर कोळसे, (सर्व न्यायालयीन वादविवाद राहुरी न्याय कक्षे अंतर्गत)
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही) पोस्टल परवाना : SRP/146/2026-2028
The Daily Divya Sarvmanthan Is Published By The Owner And Publisher, Sapna Anil Kolse, printed It At, printer Anil Gangadhar Kolses, Swaraj Press And Printing. S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705 And Published At S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705. editor-anil Gangadhar Kolse,
e-Mail-Sarvmanthan16@gmail.com, MHMAR/26/A3154. Postal Licence Number : SRP/146/2026-2028